# महाराष्ट्र शासन

शासन ज्ञापन क्र.एलसीएस-२६१२/प्र.क्र.-/ पुनर्बांधणी-८/ज-३,
महसूल व वन विभाग, मंत्रालय,
३२ वा मजला, सेंटर-१ इमारत,
जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,
मुंबई-४००००५.
दिनांक: २२ ऑक्टोबर, २०१२.

W.J. - 515
1/11/02

145

**विषय : जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे अंधेरी, ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ९६ मधील नाल्यावर (ओहोळ) कॉन्टीलीव्हर पध्दतीने १.८ मी.x२२.५ मी. असा ४०.५ चौ.मी. क्षेत्रावर रस्ता बांधण्यास ना हरकत मिळणेबाबत.

**शासन ज्ञापन :**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्र. सी/ कार्या-३ च/ कावि-४०८/ २०१०, दिनांक ३१/१/२०१२ व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्र. मशा/ कार्या २/ जमीन ३/ का.वि.१८७३/ २०१२, दिनांक ३०/३/२०१२ ला अनुसरुन विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मौ. अंधेरी, न.भू.क्र. ९६ मधील नाल्यावर (ओहोळ) १.८ मी. X २५.५ मी. अशा एकूण ४०.५ चौ.मी. क्षेत्रावर अंधेरी कृपा प्रसाद को.ऑप. हौसिंग सोसायटीला कॉन्टीलीव्हर पध्दतीने रस्ता बांधण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम-३७ मधील तरतुदीनुसार ४०.५ चौ.मी. क्षेत्राची प्रचलित बाजारभावाने होणारी पूर्ण किमत आकारुन खालील अटी व शर्तीवर शासनाची "ना हरकत" देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :-**

(१) संदर्भित ४०.५ चौ.मी. जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.
(२) सदर क्षेत्रावर कोणताही चटईक्षेत्र निर्देशांक किंवा विकास हस्तांतरणीय हक्क मिळणार नाहीत.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पत्र क्र.डीवायसीएचई/ एसडब्ल्यूडी/ ११५६/ पीसी, दिनांक २१/९/२०१० मधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

29 OCT 2012
23226

...२/-

Scanned by CamScanner

(४) कॉन्टीलीव्हर पध्दतीने बांधण्यात येणा-या रस्त्याच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची जबाबदारी मुंबई महानगरपालिका व अंधेरी कृपा प्रसाद को.ऑप. हौसिंग सोसायटी / मे. जी. डी. सांभारे आणि कंपनी यांची राहील. याबाबत महाराष्ट्र शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

(५) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

प्रतिलिपी -

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७) उपसंचालक, भूमि अभिलेख, मुंबई
८) सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
९) सचिव, अंधेरी कृपा प्रसाद को.ऑप. हौसिंग सोसायटी, अंधेरी, मुंबई.
१०) श्री. जी. डी. सांभारे आणि कंपनी, वास्तुविशारद, गोल्डन बंगला, ७ वा मजला, जुहू रोड, सांताक्रुझ (प.), मुंबई.
११) ज-३ कार्यासन (निवड नस्ती), महसूल व वन विभाग.

....

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा

क्रमांक: सी/१/कार्या-३ब/एफ-२९८
दिनांक:- २६/११/२०१२

प्रति,
मे. जी.डी. सांभारे आणि कंपनी, (वास्तूविशारद),
अंधेरी कृपाप्रसाद को.ऑप. हौ.सोसायटी
गोल्डन बंगला, ७ वा मजला,जुहू रोड,
सांताक्रुझ (प.),मुंबई - ४०० ०५४.

विषय - <u>जमीन मुंबई उपनगर जिल्हा</u>
मौजेअंधेरी ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ९६ मधील नाल्यावर (ओहोळ) कॉन्टीलीव्हर पध्दतीने १.८ मी. X २५.५ मी. असा ४०.५ चौ.मी. क्षेत्रावर रस्ता बांधण्यास ना हरकत मिळणेबाबत.

संदर्भ - १) शासन महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र.एलसीएस-२६१२/प्र.क्र./पुर्नबांधणी-८ /ज-३, दि.२२/१०/२०१२.
२) कार्यालयीन पत्र क्र.सी/१/कार्या-३ब/कावि-४०८/१० दि.१६/११/२०१२.
३) श्री.जी.डी. सांभारे आणि कंपनी, वास्तुविशारद यांचेकडील पत्र दि.१६/११/२०१२.

मौजे अंधेरी ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ९६ मधील नाल्यावर (ओहोळ) १.८ मी. X २५.५ मी. अशा एकूण ४०.५ चौ.मी. क्षेत्रावर अंधेरी कृपाप्रसाद को.ऑप. हौसींग सोसायटीला कॉन्टीलीव्हर पध्दतीने रस्ता बांधण्यासाठी वास्तुविशारद मे. जी.डी. सांभारे आणि कंपनी यांनी दि.१०/१२/२०१० चे पत्राने विनंती केली होती.

मे. जी.डी. सांभारे आणि कंपनी यांचे विनंतीच्या अनुषंगाने मौजे अंधेरी ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ९६ मधील नाल्यावर (ओहोळ) १.८ मी. X २५.५ मी. अशा एकूण ४०.५ चौ.मी. क्षेत्रावर अंधेरी कृपाप्रसाद को.ऑप. हौसींग सोसायटीला कॉन्टीलीव्हर पध्दतीने रस्ता बांधण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम ४० व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ मधील मधील तरतुदीनुसार नुसार ४०.५ चौ.मी. क्षेत्राची प्रचलित बाजारभावाने होणारी पुर्ण किंमत आकारून संदर्भिय पत्र क्र.१ कडील शासन ज्ञापनाव्दारे मान्यता दिलेली आहे.

उक्त ४०.५ चौ.मी. क्षेत्राकरिता सन २०१२ च्या शिघ्रसिध्द गणकानुसार रुपये ४९,६००/- प्रति चौ.मी. दर प्रस्तावित असून सदर दराप्रमाणे ४०.५ चौ.मी. क्षेत्राकरीता पूर्ण किंमत रक्कम रुपये २०,०८,८००/- (रुपये वीस लाख आठ हजार आठशे मात्र) होत आहे. सदरची रक्कम मे. जे.डी. सांभारे आणि कंपनी यांनी दि.१६/११/२०१२ च्या पत्रासोबत पे ऑर्डर क्र.३२६७७३

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,प्रशासकीय इमारत १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१ कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormumbaisuburban@mah.gov.in


Scanned by CamScanner

दि.६/११/२०१२ अन्वये या कार्यालयात अदा केली आहे. तसेच नाल्यावर (ओहोळ) कॉन्टीलीव्हर पध्दतीने रस्ता बांधण्यासाठी शासन अटी/ व शर्ती मान्य असल्याबाबत रक्कम रुपये २००/- च्या मुद्रांक शुल्क पेपरवर हमीपत्र सादर केले आहे. त्यानुसार प्रश्नांकित नाल्यावर (ओहोळ) मे. जी.डी. सांभारे आणि कंपनी/अंधेरी कृपाप्रसाद को.ऑप. हौसींग सोसायटीला कॉन्टीलीव्हर पध्दतीने रस्ता बांधण्यासाठी खालील अटी व शर्तीस अधीन राहून नाहरकत देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१) संदर्भित ४०.५ चौ.मी. जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून राहील.

२) सदर क्षेत्रावर कोणताही चटईक्षेत्र निर्देशांक किंवा विकास हस्तांतरणीय हक्क मिळणार नाहीत.

३) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे पत्र क्र.डीवायसीएचई/ एसडब्लूडी/११५६/पीसी, दिनांक २१/९/२०१० मधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील .

४) कॉन्टीलीव्हर पध्दतीने बांधण्यात येणा-या रस्त्याच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची जबाबदारी मुंबई महानगरपालिका व अंधेरी कृपाप्रसाद को.ऑप. हौसींग सोसायटी/ मे.जी. सांभारे आणि कंपनी यांची राहील. याबाबत महाराष्ट्र शासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

५) सदर जमीन/ जमिनीचा भाग भविष्यांत शासनास गरज भासल्यास कोणतीही नुकसान भरपाई किंवा पर्यायी जमीन न देता प्रश्नाधीन जमीन प्रतिग्रहित्याकडून काढून घेण्यात येईल.

६) नाल्याचा (ओहोळ) प्रवाह सुकर होईल व त्यास कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.

प्रतिलीपी-१)अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग मंत्रालय यांजकडे माहितीसाठी सविनय सादर

२)मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई, यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

३)आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई, यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

४)तहसिलदार अंधेरी, यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

५)नगर भूमापन अधिकारी, अंधेरी यांचेकडे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

६)सचिव, अंधेरी कृपाप्रसाद को.ऑप. हौ.सोसायटी, अंधेरी मुंबई यांना माहितीसाठी.

Received true copy

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,प्रशासकीय इमारत १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१ कार्यालय ९१-२६५५६७९९/२६५५७८०७ फॅक्स २६५५६८०५ इमेल collectormumbaisuburban@mah.gov.in
D:\sankirna\... कृपाप्रसाद संस्था आदेश.doc

Scanned by CamScanner